# माहितीपुस्तिका

## गरजु लाभार्थ्यांकरिता विविध शासकीय कार्यक्रम व योजना

**(A DOSSIER ON ENTITLEMENTS OF THE POOR HOUSEHOLDS AND GOVERNMENT PROGRAMMES)**

An end to end approach to agriculture

## कृषि समृध्दी : समन्वयीत कृषि विकास प्रकल्प

# औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना

**उद्देश व स्वरुप :**

आदिवासी समाजातील तरुणांमध्ये औद्योगिक शिक्षण घेणा-यांची संख्या कमी आहे. तांत्रिक शिक्षण घेणा-यांना नोकरी व स्वयंरोजगारास जास्त वाव आहे. हे शिक्षणक्रम इ. ८ वी व १० वी नंतरचे परंतू पदवी / पदविका अभ्यासक्रम नसल्याने त्यांना इतर विद्यावेतनाच्या योजनंाचा फायदा मिळू शकत नाही. परंतू सर्वसाधारण शिक्षणक्रमापेक्षा जास्त खर्च येतो. म्हणून औद्योगिक प्रशिक्षण घेण्यास आदिवासी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने ही योजना राबविण्यात येते. ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १२०००/- पेक्षा कमी आहे, अशा अनिवासी विद्यार्थ्यांना दरमहा रु. ६०/- व संस्थेतील निवासी विद्यार्थ्यांना दरमहा रु. १००/- दराने विद्यावेतन देण्यात येते.

**पात्रतेच्या अटी :**

१. विद्यार्थी आदिवासी व महाराष्ट्राचा रहिवाशी असावा.
२. पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.१२०००/- पेक्षा कमी असावे.
३. विद्यार्थ्याने संबंधित संस्था प्रमुखांकडे उत्पन्नाच्या दाखल्यासह अर्ज केला पाहिजे.

**संपर्क :**

संबंधित प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था.

# इयत्ता आठवी ते बारावीच्या वर्गात शिकत असलेल्या अनुसूचित जमातीच्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना

**उद्देश व स्वरुप :-**

अनुसूचित जमातीच्या अपंग विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यात अडचणी येऊ नयेत. शाळेत जाण्यासाठी प्रवास खर्चाची अडचण येऊ नये म्हणून सन २००३-२००४ पासून इयत्ता ८ वी ते इयत्ता १२ वी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या अपंग विद्यार्थ्यांना प्रतिमहा रुपये ५०० /- शिष्यवृत्ती व रुपये १०० /- प्रतिमहा वाहतूक भत्ता देण्याची योजना राबविण्यात येत आहे.

**पात्रता :-**

१. विद्यार्थी / विद्यार्थीनी अनुसूचित जमातीची असावी.
२. ४० % अपंगत्व असल्याचा सक्षम अधिका-याचा दाखला.
३. विद्यार्थी / विद्यार्थीनी इ. ८ वी ते इ. १२ वी च्या वर्गात शिक्षण घेत असावी.
४. विद्यार्थी / विद्यार्थीनी, शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, वसतीगृह अगर शासनाच्या अन्य उपक्रमाद्वारे राबविण्यात येणा-या संस्थेत निवासी विद्यार्थी नसावेत.

**संपर्क :-**

संबंधित शाळेचे मुख्याध्यापक, संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

# शालांत व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेत विशेष प्राविण्य मिळविणा-या गुणवत्ता यादीतील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिस योजना

**उद्देश व स्वरुप :-**

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा व त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून राज्यातील आठही परीक्षा मंडळातून उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत विशेष गुणांसह गुणवत्ता यादीतील पहिली तीन मुले आणि मुली यांना बक्षिस देण्याची योजना सन २००३-२००४ या वर्षापासून राबविण्यात येत आहे. प्रथम क्रमांक रुपये ३५,००० /- द्वितीय क्रमांक रुपये २५,००० /- व तृतीय क्रमांक रुपये १५,००० /- तसेच प्रत्येक परीक्षा मंडळातून यादीतील पहिली तीन मुले आणि मुली यांना प्रथम पारितोषिक रुपये २५,००० /- द्वितीय पारितोषिक रुपये १५,००० /- आणि तृतीय पारितोषिक रुपये १०,००० /- प्रोत्साहनपर बक्षिस योजना सन २००३-२००४ पासून राबविण्यात येत आहे.

**पात्रता :-**

१. विद्यार्थी / विद्यार्थीनी अनुसूचित जमातीचे असावेत.

**संपर्क :-**

शासकीय / अनुदानित आश्रमशाळा व इतर शाळा कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक / प्राचार्य, संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

# दर्जेदार शासकीय / अनुदानित आश्रमशाळांना विशेष प्रोत्साहनपर बक्षिस योजना

**उद्देश व स्वरुप :-**

शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळेचे कामकाजात गुणात्मक बदल व्हावा. दर्जेदार शिक्षण, शाळेचे वातावरण, शाळेचे कामकाज, आश्रमशाळांच्या कामकाजात कर्मचा-यांचा सहभाग वाढीस लागावा या करीता आश्रमशाळांमध्ये स्पर्धा निर्माण व्हावी म्हणून चांगल्या तीन आश्रमशाळांना प्रथम, द्वितीय व तृतीय बक्षिस देण्याची योजना सन २००३-०४ पासुन राबविण्यात येत आहे. प्रथम पारितोषिक रुपये ५ लक्ष, द्वितीय पारितोषिक रुपये ३ लक्ष व तृतीय पारितोषिक रुपये २ लक्ष असा पुरस्कार देण्यात येईल.

**पात्रता :-**

आश्रमशाळांचा गेल्या तीन वर्षांचा शालांत परिक्षेचा निकाल किमान ९० टक्के असावा. न्यायालयीन / फौजदारी कारवाई, संस्था अथवा शाळेच्या विरुध्द झालेली वा प्रस्तावीत नसावी, गेल्या ३ वर्षांची मुलांची उपस्थिती ९० टक्के असावी. पिण्याचे पाणी, शौचालय, स्नानगृहे, क्रिडांगण, पक्की शाळेची इमारत, स्वयंपाक गृह, फर्निचर, आंथरुण-पांघरुण, खेळाचे साहित्य इ. सुविधा शाळेत उपलब्ध असावी. मुलांचे संगोपन, जेवण, नाष्टा वगैरे वेळच्या वेळी दिले गेले पाहिजे. वृक्ष लागवड कार्यक्रम यशस्वीरित्या राबविलेले असावे. मुलांमध्ये नैतिक शिक्षण, सर्वांगीण शिक्षण, शाळेचे सामाजिक कार्य, जवळच्या गावांच्या विकास प्रक्रियेत शाळेचा सहभाग आणि मुला-मुलींचे लैंगिक, शारिरीक, मानसिक शोषण केल्याच्या तक्रारी नसाव्यात.

**संपर्क :-**

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

# आदिवासी मुलींमधील गळती थांबविण्यासाठी प्रोत्साहन भत्ता

**उद्देश व स्वरुप :**

इयत्ता ५ वी ते इयत्ता ७ वी तसेच इयत्ता ८ वी ते इयत्ता १० वी या वर्गात शिकत असलेल्या आदिवासी मुलींमधील गळती कमी करण्यासाठी दरमहा प्रोत्साहन भत्ता देण्याची योजना सन २००३-०४ पासून सुरु करण्यात आलेली आहे. राज्यात सर्वत्र ही योजना लागू राहील. इयत्ता ५ वी ते इयत्ता ७ वी या वर्गात शिकत असलेल्या आदिवासी मुलींना त्या-त्या वर्षात किमान ७० टक्के उपस्थिती असल्यास दरमहा रुपये ५० /- तर इयत्ता ८ वी ते इयत्ता १० वी मध्ये शिकत असलेल्या आदिवासी मुलींना ७० टक्के उपस्थिती असल्यास दरमहा रुपये १०० /- प्रोत्साहन भत्ता देण्यात येईल.

**पात्रता :**

१. मुलगी आदिवासी जमातीची असावी.
२. इयत्ता ७ वी ते १० वी पर्यंतच्या वर्गातील असावी.
३. जातीचा दाखला नसल्यास पालकांचा जातीचा दाखला किंवा वडिलांचा शेतीचा ७/१२ चा उतारा किंवा भाऊ, बहिण यांचा जातीचा दाखला ग्राहय धरण्यात येईल.
४. आदिम जमातीच्या विद्यार्थिनींकडे वरील दाखले नसल्यास सरपंचाचा जातीचा दाखला ग्राहय धरण्यात येईल.

**संपर्क :**

संबंधित आश्रमशाळेचे मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख तसेच त्या त्या क्षेत्राचे अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प.

# राज्यातील विद्यार्थ्यांसाठी अपघात विमा योजना

**उद्देश व स्वरुप :-**

अपघातामुळे विद्यार्थ्यांना पोहोचलेल्या क्षतीची काही प्रमाणात नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने तसेच त्यांना सुरक्षा कवच देण्याकरिता राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी चालविलेल्या शाळा, तसेच खाजगी संस्थांनी चालविलेल्या मान्यता प्राप्त शाळा, महाविद्यालये यामधील सर्व विद्यार्थ्यांसाठी राज्यशासनामार्फत अपघात विमा योजना कै. राजीव गांधी, माजी पंतप्रधान यांच्या जन्मदिनी दिनांक २० ऑगस्ट २००३ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांचा विमा ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनी लि., या विमा कंपनीकडे उतरविण्यात येत आहे.

या विमा योजनेअंतर्गत दिवसाच्या २४ तासात विद्यार्थ्याला अपघात झाल्यास त्यास खालीलप्रमाणे भरपाईची रक्कम विमा कंपनीकडून मिळेल.

गट अभ्यासक्रम मिळणारी विम्याची रक्कम

१. अपघाती मृत्यू रु. ३०,००० /-
२. कायमची अंपगत्व (दोन अवयव / डोळे किंवा एक अवयव किंवा एक डोळा निकामी) रु. ५०,००० /-
३. अपघातामुळे एक अवयव आणि एक डोळा निकामी होणे रु. २०,००० /-
४. अपघातामुळे उद्‌भवलेला वैद्यकीय खर्च कमाल रु. २००० /- कमाल रु. १०,००० /- शस्त्रक्रियेसाठी
५. अपघातामुळे पुस्तके हरविल्यास कमाल रु. ३५० /-
६. अपघातामुळे विद्यार्थी परिक्षेस बसु न शकल्यास परिक्षा शुल्काची प्रतिपूर्ती कमाल रु. ६५० /-
७. अपघातामुळे सायकल चोरीला गेल्यास किंवा नुकसान झाल्यास कमाल रु. १५०० /-
८. अपघातामुळे चष्मा हरविल्यास कमाल रु. ७५० /-

या विमा योजनेअंतर्गत खालील विभागाच्या अखत्यारीतील शाळा / महाविद्यालयातील इ.१ली ते उच्च शक्षणापर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांचा अपघात विमा उतरविण्यात येईल.

१. आदिवासी विकास विभाग आश्रमशाळा
२. सामाजिक न्यायविभाग आश्रमशाळा
३. कृषि विभागांतर्गत कृषी महाविद्यालये
४. उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाविद्यालये तंत्रनिकेतन औद्योगिक प्रशिक्षण अभियांत्रिकी महाविद्यालये व अन्य शैक्षणिक संस्था
५. वैद्यकीय शिक्षण विभाग वैद्यकीय महाविद्यालये व इतर पाठयक्रम
६. शालेय शिक्षण विभाग प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा

**संपर्क :-**

संबंधित शाळा / महाविद्यालये यांचे मार्फत विमा ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनी लि.

# आदिवासी विद्यार्थ्यांचा आकस्मिक मृत्यू झाल्यानंतर सानुग्रह अनुदान योजना

**उद्देश व स्वरुप :-**

आदिवासी विकास विभागामार्फत चालविण्यात येणा-या शासकीय आश्रमशाळा हया अतिदुर्गम व जंगलमय प्रदेशात निवासी शाळा कार्यरत आहेत. तेथे काही नैसर्गिक आपत्ती व अपघातामुळे शासकीय आश्रमी विद्यार्थी मृत्यू पडण्याच्या घटना घडत असतात. शासनाची पालकत्वाची जबाबदारी म्हणून व शैक्षणिक विकासातील महत्वाची समन्वयक म्हणून टाकण्यात आलेली जबाबदारी यादृष्टीने विद्यार्थी / विद्यार्थीनींचा मृत्यू झाल्यास सामाजिक दृष्टीकोनातून तातडीचे अर्थसहाय्य म्हणून विद्यार्थ्यांच्या पालकास रु. १५,००० /- सानुग्रह अनुदान शासनामार्फत मंजूर करण्याची योजना राबविण्यात येत आहे.

तसेच राज्यातील शाळा स्वयंसेवी संस्थांमार्फतही चालविण्यात येऊन विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यात येत आहे. काही नैसर्गिक आपत्ती व अपघातांमुळे अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थी मृत्यू पडण्याच्या घटना घडत असतात. अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे पालकत्व संबंधित संस्थेकडे असल्याने संपूर्ण विद्यार्थ्यांची देखभाल संस्थेमार्फत करण्यात येते. विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्यास तातडीचे अर्थसाहय संबंधित संस्थेमार्फत पालकास रु. १५,००० /- सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात येते.

**पात्रता :-**

१. विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा व तो शासकीय आश्रमशाळा व अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थी आश्रमीय असावा.

२. घटनेचा रितसर पंचनामा व संबंधित यंत्रणेकडून चौकशी झालेली असावी.

**संपर्क :-**

संबंधित शाळेचे मुख्याध्यापक व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

## (ब) आर्थिक उन्नतीच्या योजना

# आदिवासी शेतक-यांना विजपंप / तेलपंप पुरवठा करणे.

**उद्देश व स्वरुप :**

१. आदिवासी शेतक-यांना त्यांचा शेतीविकास किफायतशीरपणे होण्याच्या दृष्टीने उपलब्ध असलेल्या साधनाचा व उर्जेचा पुरेपुर उपयोग करुन त्याव्दारे जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली आणुन आदिवासींचा आर्थिक विकास साधण्याच्या हेतुन १०० टक्के अनुदानावर विजपंप / तेलपंप पुरविण्यात येत आहे.

२. या योजनेखाली सर्वसाधारण पणे ३ किंवा ५ अश्वशक्तीचे विजपंप / तेलपंप मंजूर करण्यात येतात.

३. राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्र व क्षेत्राबाहेरील आदिवासी शेतक-याकडे किमान ६० आर (दीड एकर) आणि कमाल ६ हे.४० आर (१६ एकर) इतकी लागवाडीयोग्य जमीन उपलब्ध आहे. अशा शेतकरी या योजनेचा लाभ घेवु शकतात.

**पात्रता :**

१. आदिवासी शेतक-यांना विजपंप मंजूर करतांना त्यांच्या शेतातील पाण्याचे साधन असलेल्या विहिर / नाल्यास कमीत कमी सहा महिने पाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

२. आदिवासी शेतकरी स्वत: जमीन कसत असला पाहिजे.

३. ६० आरपेक्षा कमी जमीन ज्यांच्या नांवाने असेल अशा किंवा ३ लगतच्या जमीन धारकांना एकत्रित येऊन करार लिहुन दिला तर एका पेक्षा अधिक लाभधारक एकत्रितपणे या योजनेचा लाभ घेऊ शकतील. मात्र अशा एकत्रित आलेल्या शेतक-यांची एकूण जमीन ६० आरपेक्षा जास्त असली पाहिजे.

४. या योजनेखाली ज्या गांवात / शेतात विजपुरवठा केला जावु शकतो त्या गावच्या शेतक-यास विजपंप व जेथे वीजपुरवठा केला जात नाही अथवा नजीकच्या ३ वर्षात केली जाण्याची शक्यता नाही अशा ठिकाणी तेलपंप पुरविण्यात येतो.

**संपर्क:**

संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, प्रादेशिक व्यवस्थापक / उपप्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ.

# केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट)

**उद्देश व स्वरुप :**

ज्या योजनाचा समावेश अर्थसंकल्पात नाही अशा अभिनव स्वरुपाच्या स्थानिक महत्वाच्या कर्जविरहीत योजना तातडीने व प्रभावीपणे कार्यान्वित करुन गरजु आदिवासींना प्रत्यक्ष लाभ मिळवुन देणे हा योजनेचा मुख्य उद्देश. आदिवासी व्यक्ती / कुटूंब केंद्रबिंदु मानुन या योजनेतंर्गत कर्ज देणे अपेक्षित नाही.

योजनेचे स्वरुप खालीलप्रमाणे

१. योजनेतंर्गत प्रत्येक आदिवासी व्यक्तीस / कुटूंबास / सामुहिक प्रकल्पात / कार्यक्रमातंर्गत आर्थिक मर्यादा रु. १५०००/- पर्यंत.

२. ४ गट नमूद केले असुन

- अ) उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीच्या योजना
- ब) प्रशिक्षणाच्या योजना
- क) मानवी साधनसंपत्तीच्या विकासाच्या योजना
- ड) आदिवासी कल्याणात्मक योजना

अ या गटात अनुदानाची मर्यादा खालीलप्रमाणे

१) सर्वसाधारण आदिवासी लाभार्थी - ८५ टक्के व १५ टक्के वैयक्तिक सहभाग

२) आदिम जमाती लाभार्थी - ९५ टक्के व ५ टक्के वैयक्तिक सहभाग

३) जेथे अर्थसहाय्य रु. २००० असेल तेथे १०० टक्के अर्थसहाय्य.

४. शासन निर्णय दि. ३१ मे २००१ च्या मार्गदर्शक सुचनातील अटी शर्तीनुसार पात्र लाभार्थी व त्यांनी मागणी केल्या नुसार योजना तयार करुन प्रकल्प अधिकारी यांनी अपर आयुक्ताकडे निर्देश समितीचे अध्यक्ष या नात्याने मंजुरी घेणे.

५. योजना मंजुरीचे अधिकार रु. ७.५० पर्यंतच्या अपर आयुक्त, आदिवासी विकास रु. ७.५० ते ३०.०० लक्षपर्यंतची योजना आयुक्त, आदिवासी विकास व रु. ३०.०० लक्ष पेक्षा जास्त रकमेच्या योजनेस शासनाची मान्यता अधिकार प्रदान

६. अर्थसंकल्पात तरतूद असलेल्या एखाद्या योजनेवर अत्यावश्यक आणि अपवादात्मक परिस्थितीत पुरक खर्च न्युक्लिअस बजेट मधुन करावयाचा असल्यास प्रस्ताव मंजुरीसाठी आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडे सादर करणे.

७. शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार जे कार्यक्रम न्युक्लिअस बजेट अंतर्गत देता येत नाहीत परंतु स्थानिक परिस्थितीनुसार खास कार्यक्रम घेणे आवश्यक आहे असे निर्देश समितीस वाटल्यास त्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी सादर करणे.

**पात्रता :**

१. लाभार्थी अनुसूचित जमातीचा असावा.

२. अ या गटासाठी लाभार्थी दारिद्रय रेषेखालील असावा.

३. लाभार्थीनी सर्व कागदपत्रासह योजनेच्या लाभासाठी विहित नमुन्यातील अर्ज सादर करणे आवश्यक.

४. योजनेशी संबंधित विविध खात्याच्या जिल्हास्तरावरील अधिकारी यांचे सहकार्याने व समन्वयाने योजना राबविणे.

**संपर्कः**

संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

# व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना (केंद्रपुरस्कृत योजना)

**उद्देश व स्वरुप :**

आदिवासी युवकांकरिता स्थानिक गरजांवर आधारित लहान लहान प्रशिक्षण अभ्यासक्रम राबवून त्यांना स्वयंरोजगाराची संधी देणे, तसेच आदिवासी भागातील लोकांना अत्यंत गरजेची यंत्रे व अवजारे स्थानिकरित्या दुरुस्त करुन घेण्याच्या दृष्टीने कुशल कारागीर उपलब्ध करुन देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ही व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे सध्या ४ निवासी पोस्ट बेसिक आश्रमशाळांमध्ये सुरु करण्यात आली आहे. यात इलेक्ट्रीशिअन, ऑईल इंजिन / इलेक्ट्रिक मोटार दुरुस्ती, मोटार मॅकॅनिक इ. अभ्यासक्रम शिकविले जातात. प्रशिक्षणाचा कालावधी ४ महिने असतो. एका सत्रात ५० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. प्रशिक्षणार्थींच्या इच्छेनुसार ३ प्रकारच्या अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण त्याला घेता येईल. या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थीस दरमहा रु.४००/- विद्यावेतन तसेच प्रशिक्षणानंतर ३ महिने शहरी भागातील कार्यशाळेत प्रात्यक्षिकांची संधी, आवश्यक कच्चे साहित्य व अनुषंगिक अवजारे पुरविण्यात येतात.

**पात्रतेच्या अटी :**

प्रशिक्षणार्थी अनुसूचित जमातीचा असावा व इ.९ वी पर्यंत शिक्षण झालेले असावे.

**संपर्क :**

संबंधित पोस्ट बेसिक आश्रमशाळांचे मुख्याध्यापक व संबंधित क्षेत्राचे प्रकल्प अधिकारी

# स्वयंरोजगारासाठी कर्जपुरवठा योजना

## (शबरी वित्त व विकास महामंडळ मर्यादित)

**उद्देश व स्वरुप :**

आदिवासी बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने स्वतःचे विविध व्यवसाय सुरु करण्याकरिता अर्थसहाय्य उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ही योजना एन.एस.सी.एफ.डी.सी, नवी दिल्ली या राष्ट्रीय स्तरावरील वित्तीय व विकास संस्थेच्या सहकार्याने राबविण्यात येते.

या योजनेंतर्गत खालीलप्रमाणे एन.एस.सी.एफ.डी.सी व शबरी महामंडळ यांचेकडून २.५० लक्ष रुपयांपर्यंतच्या गुंतवणूकीच्या व्यवसायाकरिता लाभार्थ्याने ५ टक्के स्वभाग भरल्यास ९५ टक्के कर्ज व २.५० लक्ष रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूकीच्या व्यवसायाकरिता लाभार्थ्याने १० टक्के स्वभाग भरल्यास ९० टक्के कर्ज उपलब्ध करुन देण्यात येते.

या कर्जावर रु ५.०० लक्ष पर्यंत दरसाल दर शेकडा ७ टक्के व्याज व त्यापेक्षा जास्त कर्ज रकमेवर दरसाल दरशेकडा ९ टक्के व्याज आकारण्यात येते.

या योजनेंतर्गत वाहन खरेदी, शेळीपालन, जनरल स्टोअर्स अशा जवळपास १२८ प्रकारच्या व्यवसायांपैकी वेळोवेळी दरवर्षी एन.एस.सी.एफ.डी.सी ने मंजूर केलेल्या व्यवसायांना कर्ज पुरवठा करण्यात येतो.

**पात्रता :**

१. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी व अधिसूचित अनुसूचित जमातीचा असावा.

२. अर्जदाराचे वय १८ ते ४० वर्ष मर्यादेत असावे.

३. अर्जदाराचे वार्षिक कौटूंबिक उत्पन्न जास्तीत जास्त रु.३१,९५२ पर्यंत ग्रामीण भागासाठी व रु.४२,४१२ शहरी भागासाठी असावे.

४. ज्या व्यवसायांना परवाना / विशिष्ठ पात्रता आवश्यक असेल तो आवश्यक परवाना व विशिष्ठ पात्रता असणे आवश्यक आहे.

५. परवानाधारकाने दोन पात्र आदिवासी जामीनदारांचे जामीनपत्र. ७/१२ उतारा इ .दस्तऐवज द्यावे लागतील. संपर्क : शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित नाशिकची खालील

**कार्यालये :-**

(अ) मुख्य कार्यालय - नाशिक - संपूर्ण राज्य

(ब) शाखा कार्यालये व कार्यक्षेत्र.

- नाशिक नाशिक जिल्हा
- जव्हार(जि.ठाणे) ठाणे, रायगड, सिंधूदूर्ग, रत्नागिरी, मुंबई व उपनगरे.
- नंदुरबार धुळे, नंदुरबार
- यावल (जि.जळगाव) जळगाव, औरंगाबाद, जालना, **बुलढाणा**

- जुन्नर (जि.पुणे) पुणे, अहमदनगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, लातूर,
- उस्मानाबाद, बीड
- **धारणी (जि.अमरावती) अमरावती, अकोला**
- **यवतमाळ यवतमाळ, वाशिक**
- किनवट (जि.नांदेड) नांदेड, परभणी, हिंगोली
- नागपूर नागपूर, **वर्धा**
- देवरी, जि.भंडारा भंडारा, गोंदिया
- चिमूर (जि.चंद्रपूर) चंद्रपूर
- गडचिरोली

# भारतीय संविधनाच्या २७५(१) अंतर्गत जिल्हयात वाडी कार्यक्रम राबविणे - केंद्रीय सहाय्य

**उद्देश व स्वरुप :-**

लोकसंख्या वाढीमुळे अनिर्बंध जंगलतोड, वन उत्पादनाच्या पुरवठयातील झालेली घट, वन अच्छादनाचा -हास याचा आदिवासींच्या उपजीविकेवर परिणाम होऊ लागल्याने व आदिवासी शेतकरी अतिदुर्गम भागात राहात असल्यामुळे त्यांना उपलब्ध होत असलेली शेत जमिन, पिकाचे उत्पन्न घेण्यास अयोग्य आहे. आदिवासींचे स्थलांतरण होण्याचे प्रमाण रोखण्यासाठीची परिस्थिती लक्षात घेऊन केंद्र शासनाने आदिवासींच्या सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने राज्याच्या नंदूरबार जिल्हयातील अक्कलकुवा व धडगाव तालुक्यातील अतिदुर्गम भागात राहणा-या आदिवासी कुटूंबाकरीता वाडी कार्यक्रम (कृषी, फळबाग व वनीकरण) राबविण्याची योजना चालू आर्थिक वर्षात आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. विकेंस-२००३/प्र.क्र.११४/का.९, दिनांक ८.९.२००३ अन्वये मंजूर केली आहे. त्यासाठी रुपये २५२.०० लक्ष निधी उपलब्ध झालेला आहे.

सदरची योजना मित्रा या संस्थेद्वारा तीन वर्षात राबविण्यास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. या योजनेमार्फत स्वयंरोजगार निर्माण करणे, जमिनीची उत्पादक क्षमता वाढ, उत्पन्नात वाढ, पाण्याच्या उपलब्धतेत वाढ, आरोग्य व राहणीमानात सुधारणा करणे ही प्रमुख उद्दिष्टे आहेत.

सदर योजनेअंतर्गत १,००० लाभार्थ्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले असून कालावधी तीन वर्षासाठीचा आहे.

**पात्रता :-**

१. लाभार्थी अनुसूचित जमातीचा असावा.
२. ५ एकरापर्यंत जमिन असलेला भूमीधारक असावा.
३. लाभक्षेत्रातील किमान ८० टक्के लाभार्थी दारिद्रयरेषेखालील असावा.

**संपर्क :-**

- आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
- अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
- प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, तळोदा / नंदुरबार.

## आदिम जमातीसाठी विकासाच्या योजना - केंद्रीय सहाय्य

**उद्देश व स्वरुप :-**

अनुसूचित क्षेत्रात दुर्गमतेमुळे पुरेशा प्रमाणात सुविधा उपलब्ध नाहीत अशा क्षेत्रातील अतिमागास व दारिद्रय रेषेखालील जीवन जगणा-या आदिम जमातीच्या शेतक-यांसाठी त्यांना सुधारित शेतीची गोडी निर्माण व्हावी. शेतीत सुधारणा व्हावी, पर्यायाने त्यांचा विकास व्हावा व त्यांची आर्थिक स्थिती सुधारावी व त्यांना मुख्य प्रवाहात सामील होता यावे या उद्देशाने वाडी विकास कार्यक्रम योजना शासनाने पेण व पांढरकवडा या प्रकल्प क्षेत्रांतर्गत आदिम जमातीच्या लोकांसाठी आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. आदिम-२२०३/प्र.क्र.८५/का.१७, दिनांक १९.८.२००३ अन्वये मंजूर करण्यात आली आहे. सदरची योजना महाराष्ट्र इन्स्टीटयूट ऑफ टेक्नॉलॉजी ट्रान्सफर फॉर रुरल एरीयाज (मित्रा), नाशिक या संस्थेमार्फत राबविण्यात येत असून या योजनेमार्फत स्वयंरोजगार निर्माण करणे, जमिनीची उत्पादन क्षमतेत वाढ, शेतीच्या उत्पन्नात वाढ, कुटूंबाच्या स्थलांतरामध्ये घट, आरोग्य व राहणीमान यात सुधारणा करणे ही प्रमुख उद्दिष्टे आहेत. त्यासाठी रुपये ६६.०० लक्ष निधी उपलब्ध झालेला आहे.
या योजनेअंतर्गत एकूण ३०० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.

**पात्रता :-**

१. लाभार्थी आदिम जमातीचा असावा व त्या लाभ क्षेत्रातील असावा.
२. लाभार्थी ५ एकरापर्यंत भूमीधारक असावा.
३. लाभार्थी दारिद्रयरेषेखालील असावा.

**संपर्क :-**

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण / पांढरकवडा.

# मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना.

**उद्देश व स्वरुप :**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील वाहन चालक संदर्भातील रिक्त पदांचा अनुशेष भरुन निघावा व पर्यायाने अनुसूचित जमातीच्या युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने राज्यात परिवहन महामंडळ व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने पांढरकवडा व गडचिरोली येथे प्रशिक्षण केंद्र सुरु आहे. मोटार वाहन चालक प्रशिक्षण सत्राचा कालावधी प्रथम सत्र एप्रिल ते सप्टेंबर व व्दितीय सत्र ऑक्टोबर ते मार्च या कालावधीत प्रशिक्षणर्थीना तांत्रिक, अतांत्रिक चालक विषयक बाबीवर सखोल प्रशिक्षण देण्यात येते. तसेच प्रशिक्षणार्थ्यांकडुन वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देऊन सराव करण्यात येतो.

**पात्रता :**

१. उमेदवार आदिवासी असावा.
२. वय २३ ते २५ वर्षे. उंची किमान १६३ सें.मी. शिक्षण ७ वी उत्तीर्ण.
३. उमेदवार शारीरिक व मानसिकदृष्टया वाहनचालकाचे काम करण्यास सक्षम असावा.
४. अवजड वाहन चालविण्याचा परवाना व कमीत कमी २ वर्षांचा अवजड वाहन चालविण्याचा अनुभव.

**संपर्कः**

संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

# सैन्य तथा पोलीस दल भरतीपूर्व प्रशिक्षण योजना.

**उद्देश व स्वरुप :**

राज्यातील अनुसूचित जमातीच्या युवकांना राज्य पोलीस दल व लष्कर तथा तत्सम विविध सुरक्षा दलातील अनुशेषातंर्गत संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने राज्यात एकूण ९ ठिकाणी पोलीस तथा सैन्य दल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे. शारीरिक व शैक्षणिक दृष्टया योग्य असणा-या आदिवासी तरुण / तरुणींना त्यांच्या कुटूंबाची आर्थिक व सामाजिक प्रगती होईल व त्यांचे जीवनमान उंचावेल म्हणुन सैन्यदल किंवा पोलीस दलात भरती होणेसाठी भरतीपूर्व प्रशिक्षण देणे. आदिवासी प्रशिक्षणार्थींना जेवण, राहणे, गणवेश, खेळाचे साहित्य, बुट मोजे, अंथरुण, पांघरुण इत्यादी सुविधा मोफत पुरविल्या जातात. सैन्य तथा पोलीस दल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रातील एका प्रशिक्षण सत्राचा कालावधी ४ महिन्याचा असुन प्रथम सत्र एप्रिल ते जुलै, व्दितीय सत्र ऑगस्ट ते नोव्हेंबर व तृत्तीय सत्र डिसेंबर ते मार्च या कालावधीत आयोजित करण्यात येते. एका प्रशिक्षण सत्रात ५० युवक व युवतींना प्रशिक्षण देण्यात येते.

**पात्रता :**

१. अनुसूचित जमातीचा लाभार्थी असावा.
२. उमेदवाराचे वय १८ ते जास्तीत जास्त २६ वर्षे
३. शैक्षणिक पात्रता इयत्ता १२ वी पास
४. शारिरिक पात्रता युवक उंची १६५ सें.मि., छाती ७९ सें.मि.
   युवती उंची १५५ सें.मि, छाती ७९ सें.मि. न फुगवता.

**संपर्क:**

संबंधित केंद्राचे प्रभारी प्रमुख व आपल्या प्रकल्प क्षेत्राचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

# खावटी कर्ज योजना

**उद्देश व स्वरुप :**

महाराष्ट्र राज्य आदिवासींची आर्थिक स्थिती (सुधारणा) अधिनियम, १९७६ चे तरतुदीनूसार आदिवासी उपयोजना क्षेत्रातील विशिष्ट घटकाकडून आदिवासी बांधवांची होणारी परंपरागत आर्थिक पिळवणूक व शोषण थांबविण्याकरिता व ऐन पावसाळयात उपासमार होऊ नये म्हणून शेत मजूर व अल्प भूधारकांच्या ४ युनिट पर्यंतच्या कुटूंबांना प्रत्येकी रु.२०००/-, ८ युनिट पर्यंतच्या कुटुंबांना प्रत्येकी रु.३०००/- व त्यावरील कुटुंबांना प्रत्येकी रु.४०००/- अशा सुधारित दराने खावटी कर्ज वाटप करण्यात येते. यामध्ये ९० टक्के धान्य रुपाने व १० टक्के रोख स्वरुपात लाभ देण्यात येतो.

**पात्रता :**

१. आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेचा कास्तकरी सभासद असणे आवश्यक आहे.

२. खावटी कर्ज योजनेतून घेतलेल्या कर्जाची परतफेड केलेली असावी.

३. कास्तकरी आदिवासी असावा व त्याचेकडे ७/१२ उतारा असणे आवश्यक आहे.

**संपर्क :**

संबंधित क्षेत्राचे उप प्रादेशिक व प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ, सचिव, आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था.

# धान्यकोष योजना

**उद्देश व स्वरुप :**

शासनाव्दारे राबविण्यात येत असलेल्या खावटी कर्ज योजनेला पर्याय म्हणून धान्य कोष योजना १९९५ पासून सुरु करण्यात आली आहे. खावटी कर्ज योजना वसूली होत नसल्याने शासनावर पडत असलेला बोजा कमी होवून शासनाची आर्थिक बचत व्हावी व धान्य कोष योजनेव्दारे आदिवासी भागातील गावक-यांमध्ये अन्नधान्याच्या संदर्भात आत्मनिर्भरता निर्माण व्हावी हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रात ३-४ गावांच्या समुहाकरिता (५० ते ५०० कुटूंबे) परिसरातील सेवाभावी संस्था / सहकारी संस्था / ग्रामपंचायत यांच्या मदतीने नाममात्र रु.५ ते १० प्रवेश शुल्क घेवून (आदिवासी व इतर सर्वांकरिता) धान्यकोष स्थापन करणे व त्याव्दारे कुटूंबांना आवश्यक तेव्हा गरजेनूसार धान्य उपलब्ध करुन देणे आणि १०५ ते ११५ टक्के पर्यंत हंगामानंतर धान्य रुपाने / रोखीने फेड करणे व चक्र सुरु ठेवणे असे या योजनेचे स्वरुप आहे. धान्यकोषाचे सभासद असलेले भूधारक कुटूंब ५० ते १०० किलो (१/३ हिस्सा) धान्य रुपाने व भूमिहीन कुटूंब रोखीने वर्गणी देवू शकते. आदिवासी सभासदांच्या जमा धान्यासाठयाच्या २/३ हिस्सा शासनाव्दारे आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून देण्यात येतो. धान्य साठवणुकीच्या व्यवस्थेकरिता व तराजू, काटे इत्यादीकरिता रु.३०००/- चे अर्थ सहाय्य देण्यात येते.

**संपर्क :**

(१) संबंधित धान्यकोष व्यवस्थापन संस्था.

(२) धान्य कोष स्थापनेकरिता संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

### (क) इतर योजना

## अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी सेवायोजन नोंदणी

**उद्देश व स्वरुप :**

अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची नाव नोंदणी सेवायोजन कार्यालयात करण्यात येत होती. परंतू या उमेदवारांना संधी मिळण्यास फार विलंब होतो हे लक्षात घेऊन शासनाने मागासवर्गीयांच्या नाव नोंदणीचे काम समाजकल्याण विभागावर सोपविले. १९८४-८५ मध्ये आदिवासी विकास विभाग स्वतंत्र झाल्यानंतर हे काम प्रकल्प कार्यालयांकडे सोपविण्यात आले. गरजू, सुशिक्षित अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची नावे नोंदवून तो विविध भरती अधिका-यांकडे शिफारस करुन पाठविणे व त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश.

**नाव नोंदणीच्या अटी :**

१. नांव नोंदविणारा उमेदवार अनुसूचित जमातीचा असावा.
२. त्याने विहित नमून्यात जन्मतारीखेचा दाखला, शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र इत्यादी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज केला पाहिजे.

**संपर्क :** संबंधित क्षेत्राचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

# आदिवासी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणा-या सामाजिक कार्यकर्त्यांना / संस्थांना आदिवासी सेवक / सेवा संस्था पुरस्कार योजना

**उद्देश व स्वरुप :**

आदिवासी क्षेत्रात आदिवासींच्या विकासाकरिता उत्स्फुर्तपणे काम करणा-या अनेक व्यक्ती व संस्था आहेत.त्यातील उल्लेखनीय काम करणा-या व्यक्ती व संस्थांची निवड करुन त्यांच्या कार्याचा जाहीर गौरव करुन असे काम करण्याकरिता इतर व्यक्ती व संस्थांना प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने आदिवासी सेवक / आदिवासी सेवा संस्था पुरस्कार देण्याची योजना १९८५ पासून कार्यान्वित करण्यात आली. हा पुरस्कार, प्रतिवर्षी परमपुज्य ठक्करबाप्पा यांच्या जयंती दिनी (२९ नोव्हेंबर) १५ सेवक व ७ आदिवासी सेवा संस्थांना देण्यात येतो.

**या पुरस्काराचे स्वरुप :**

१. आदिवासी सेवक रु.१०,००१/- रोख रक्कम, मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक व सत्कार.

२. सेवा संस्था रु.२५,००१/- रोख रक्कम, मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक व संस्थेच्या प्रमुखाचा सत्कार.

**पात्रता :**

१. अर्जदाराचे वय ४५ वर्षांपेक्षा जास्त असावे.

२. अर्जदार खासदार / आमदार / जिल्हा परिषद अध्यक्ष अथवा कोणत्याही अधिकार पदावर नसावा.

३. अर्जदार / स्वयंसेवी संस्था राजकारणापासून अलिप्त असावा.

४. अर्जदार व्यक्ती व संस्था यांच्याविरुध्द फौजदारी स्वरुपाचे गुन्हे नोंदविलेले नसावेत किंवा शिक्षा झालेली नसावी.

५. पुरस्कार्थींनी आदिवासी संस्कृती, संवर्धन, शिक्षण, अत्याचार निर्मूलन, अंधश्रध्दा निर्मूलन इ. प्रकारच्या क्षेत्रात आदिवासींच्या विकासाकरिता किमान १० वर्षे विशेष भरीव कार्य केलेले असावे.

६. अर्जदारांनी विहित नमून्यातील अर्ज त्यांनी केलेल्या कार्याबद्दलच्या माहितीसह (संस्थांच्या बाबतीत संस्था पब्लिक ट्रस्ट / सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्टखाली पंजीबध्द असल्याबाबतची प्रमाणपत्रे, घटनेची प्रत व मागील ५ वर्षांचे अहवाल) पाठविणे आवश्यक.

**संपर्क :** संबंधित क्षेत्राचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प. जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

# आदिवासी हस्तकला प्रदर्शन

**उद्देश व स्वरुप :**

आदिवासी हस्तकला वस्तुंना नागरी भागात मोठया प्रमाणावर बाजारपेठ उपलब्ध असल्यामुळे दुर्गम भागात राहणारे आदिवासी व नागरी भागातील ग्राहक यांना एकत्रित आणून आदिवासींनी हस्तकलेने तयार केलेल्या वस्तू प्रदर्शित करुन त्यांच्या विक्रीव्दारे या कलाकारांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेंतर्गत प्रदर्शनात भाग घेणा-या आदिवासी हस्तकलाकारांना जाण्या-येण्याचा खर्च, प्रदर्शन काळातील भत्ता, त्यांनी तयार केलेल्या वस्तुंचा प्रदर्शन स्थळापर्यंतच्या वाहतुकीचा खर्च अर्थ सहाय्याच्या स्वरुपात देण्यात येतो. त्याचप्रमाणे प्रदर्शनाच्या व्यवस्थापनाचा संपूर्ण खर्च शासनाकडून करण्यात येतो.

**पात्रता :**

१. हस्तकलाकार आदिवासी असला पाहिजे.

२. त्याने प्रदर्शनात भाग घेण्याची तयारी दाखविली पाहिजे.

**संपर्क :**

संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व संचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

# आदिवासी पारंपारिक नृत्यस्पर्धा

**उद्देश व स्वरुप :**

आदिवासी जमातीनुरूप नृत्यांचे विविध प्रकार अस्तित्वात आहेत. आदिवासींची ही स्वतःची संस्कृती जतन करण्याच्या दृष्टीने व या नृत्यांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने ही योजना तयार करण्यात आलेली आहे. या योजनेत विविध जमातींच्या नृत्य पथकांच्या स्पर्धा घेण्यात येतात. या स्पर्धाकरिता नृत्य कलाकारांना त्यांच्या गावापासून स्पर्धाच्या गावापर्यंत जाण्या-येण्याचा खर्च, हजेरी भत्ता, तसेच पारंपारिक वेषभूषा व वाद्यांसाठी अनुदान देण्यात येते. तसेच स्पर्धा आयोजनाचा खर्चही शासनाकडून केला जातो.

**संपर्क :**

संबंधित क्षेत्राचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

# वारली चित्रकला स्पर्धा योजना

**उद्देश व स्वरुप :**

ठाणे जिल्हयातील वारली या अनुसूचित जमातीच्या पारंपारिक भित्ती चित्रांना व त्यांच्या चित्रकलेस जगभर मान्यता मिळालेली आहे. या चित्रकलेचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने प्रौढ गट व शालेय गट असे दोन करुन दरवर्षी स्पर्धा घेण्यात येतात व त्यातील गुणवत्तेनुसार येणा-या पहिल्या ३१ निवडक चित्रांना बक्षिसे देण्यात येतात.

**पात्रता :**

स्पर्धेत भाग घेणा-या स्पर्धकास वारली चित्रकला येत असावी.

**संपर्क :**

संबंधित क्षेत्राचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

# आदिवासी युवकांकरिता नेतृत्व प्रशिक्षण व स्पर्धापुर्व प्रशिक्षण योजना

**उद्देश व स्वरुप :**

आदिवासी भागातील सुशिक्षित तरुणांना आदिवासी विकासाच्या विविध योजनांची तसेच समाजाचे नेतृत्व करण्याकरिता, आवश्यक त्याबाबींचे प्रशिक्षण आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे येथे आयोजित करण्यात येते. त्याचप्रमाणे महाविद्यालयांत शिक्षण घेणा-या / पूर्ण झालेल्या आदिवासी तरुणांकरिता विविध स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी, त्याकरिता असलेला अभ्यासक्रम / स्पर्धा परीक्षांचे स्वरुप, स्पर्धा परीक्षांना आवश्यक असणा-या पात्रता इत्यादीबाबत प्रशिक्षणाव्दारे माहिती देऊन त्यांना स्पर्धा परीक्षांकरिता तयार करणे हा या प्रशिक्षणाचा उद्देश. या योजनेंतर्गत मोफत निवास व भोजन पुरविण्यात येते व प्रशिक्षणाचा खर्च शासनाकडून करण्यात येतो.

**पात्रता :**

१. प्रशिक्षणार्थी आदिवासी असावा.
२. प्रशिक्षणार्थींचे आवश्यक ते शिक्षण झालेले असावे.
३. प्रशिक्षणार्थींचे नांव प्रकल्प अधिका-यांनी संस्थेकडे पाठविलेले असावे.

**संपर्क :**

संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

# नवसंजीवन योजना

**उद्देश व स्वरुप :**

आदिवासी उपयोजना क्षेत्रात शासनाने निश्चित केलेल्या निकषानुसार निवडलेल्या भागावर लक्ष केंद्रित करुन त्या ठिकाणी अत्यावश्यक शासकीय योजनांची एकत्रित व सनियंत्रित समन्वयाने अंमलबजावणी करणे व याव्दारे या क्षेत्रातील लोकांची क्रियाशील आयुष्य वाढविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. नवसंजीवन योजनेमध्ये खालील योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

१. रोजगार विषयक कार्यक्रम :

विविध रोजगार कार्यक्रमांतर्गत निवडक, विशिष्ठ भागातील रहिवाश्यांना वर्षभर पुरेल एवढा रोजगार स्थानिक स्तरावर उपलब्ध करुन देणे व त्यायोगे स्थलांतर टाळणे व त्यांचे जीवनमान उंचावणे.

२. आरोग्य विषयक कार्यक्रम :

या क्षेत्रातील रहिवाश्यांना वर्षभर आरोग्याच्या प्राथमिक सुविधा पुरविणे, पिण्याचे शुध्द व पुरेसे पाणी पुरविणे, पावसाळयात संपर्क तुटल्यानंतरही वरील सोयी उपलब्ध होतील अशी व्यवस्था करणे.

३. पोषण विषयक कार्यक्रम :

अंगणवाडयांच्या माध्यमातून मुलांना व गरोदर आणि स्तनदा मातांना पुरक पौष्टिक आहार वाटणे, श्रेणी ३ व ४ मधील बालकांना विशेष पौष्टिक आहार पुरविणे व त्यायोगे बालमृत्यु टाळणे. तसेच शाळांच्या माध्यमातून शालेय पोषण आहार देणे.

४. धान्य पुरवठा विषयक कार्यक्रम :

पावसाळयात इतर भागाशी संपर्क तुटल्यावर स्वस्त धान्य दुकानाव्दारा धान्य पुरविण्यात व्यत्यय येवू नये म्हणून अशा भागात पर्जन्यपूर्व धान्य साठा सुनिश्चित करणे. धान्यसाठा दुकाने निश्चित करुन पावसाळयासाठी लागणारा धान्यसाठा उपलब्ध ठेवणे सर्व धान्य दुकानात नेहमीच आवश्यक तेवढा धान्यसाठा उपलब्ध ठेवणे रोजगार हमी योजनेव्दारा धान्यासाठी - याव्दारे धान्य उपलब्ध करुन देणे.

५. खावटी कर्ज योजना :

सावकार व व्यापा-यांकडून होणारी पिळवणूक यांना देण्यासाठी देण्यासाठी विविध सहकारी संस्थांच्या सभासदांना ४ युनिट पर्यंत रुपये २०००/-, ८ युनिट पर्यंत रुपये ३०००/-, व त्यावरील युनिट करता रुपये ४०००/- खावटी कर्ज योजना पर्जन्यापूर्वी राबविणे, कर्जाच्या ९० टक्के धान्य स्वरुपात व १० टक्के रोख अशी राबविण्यात येते.

६. धान्य कोष योजना :

अन्नधान्य साठा सुनिश्चित करण्यासाठी धान्यकोष योजना ही राबविण्यात येत आहे. आदिवासी सहकारी संस्था, गट अशा गरजू आदिवासींसाठी १०० किलोपर्यंत प्रति लाभार्थी धान्य उपलब्ध करुन देण्यात येते. त्यामध्ये १/३

सभासदांचा हिस्सा (धान्य स्वरुपात) अपेक्षित आहे. शासनाकडून दिले जाणारे धान्य अनुदान स्वरुपात आहे. केंद्रशासनाच्या अर्थसहाय्यामधूनही १०० टक्के अनुदानावर अशी योजना राबविण्यात येत आहे.

# अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी योजना

**उद्देश व स्वरुप :**

अनुसूचित जमातीच्या लोकांची जात प्रमाणपत्राची वैधता तपासून घेण्यासाठी जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० ची अंमलबजावणी करण्या आली असून दिनांक ४.६.२००३ रोजी तशी नियम अधिसूचना निर्गमित झाली आहे. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे अध्यक्षतेखाली ठाणे, नाशिक , पुणे, औरंगाबाद व अमरावती, नागपूर येथे अर्धन्याईक स्वरुपाच्या समित्या स्थापन केलेल्या आहेत. विहित नमुन्यातील अर्ज योग्य मार्गे आवश्यक कागदपत्रांसह सादर केल्यास जात पडताळणी प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात येते.

संबंधित उपविभागीय अधिकारी अनुसूचित जमातीच्या लोकांना दिलेले जातीचे प्रमाणपत्र खरोखरच ख-या आदिवासीला दिले किंवा कसे याची पडताळणी होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्यात उक्त ठिकाणी ६ समित्यांची स्थापना करण्यात आली आहे व तत्सम प्रकरणांची तपासणी या समित्यांमार्फत करण्यात येते. सक्षम प्राधिका-यांकडून अनुसूचित जमातीचे मुळ प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर सदर प्रमाणपत्र प्रस्तावासोबत (आवश्यक ती कागदपत्रे, पुराव्यांसह) संबंधित समित्यांना तपासणी कामी प्राप्त झाल्यानंतर रितसर पोलीस दक्षता पथकामार्फत आवश्यकतेप्रमाणे प्रकरणांची चौकशी होऊन व गरजेप्रमाणे सुनावणी वगैरे सर्व प्रक्रिया होऊन वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येते.

समितीच्या पडताळणीमध्ये संबंधित उमेदवारांचे प्रमाणपत्र अवैध झाल्यास समितीव्दारा तशा प्रकारचे अवैध आदेश पारीत करण्यात येवून अशा उमेदवारांची जात प्रमाणपत्रे रद्द व जप्त करण्याचे अर्धन्याईक स्वरुपाचे अधिकार पडताळणी समित्यांना आहे. अधिनियमाप्रमाणे जी कोणतीही व्यक्ती खोटे विधान किंवा दस्तऐवज व माहिती सादर करुन लबाडीने अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळविते किंवा त्याआधारे अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर नोकरी मिळविते किंवा शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेते किंवा निवडणूक लढविते वा तत्सम फायदे घेते अशा व्यक्तीस ६ महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतू दोन वर्षांपर्यंत इतक्या सश्रम कारावसाची किंवा २००० रुपयांपेक्षा कमी नसेल परंतू २०००० रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होवू शकतात. अधिनियमान्वये सक्षम प्राधिका-याची कामे पार पाडणारी कोणतीही व्यक्ती किंवा प्राधिकारी हेतूपूरस्पर जातीचे खोटे प्रमाणपत्र देईल त्या व्यक्तीस अपराध सिध्दीनंतर सहा महिन्यापेक्षा कमी नसेल परंतू दोन वर्षापर्यंत इतक्या सश्रम कारावासाची किंवा २००० रुपयांपेक्षा कमी नसेल परंतू २०००० रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा अधिनियमात तरतूद करण्यात आली आहे.

**संपर्क :**

१. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

२. संबंधित विभागाच्या जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपसंचालक

**(ड) इतर विभागाकडून राबविण्यात येणा-या योजना**

# तुषार ठिबक सिंचन योजना

**उद्देश व स्वरुप :**

सदरची योजना जिल्हा परिषदेच्या कृषी विभागामार्फत राबविण्यात येत असून कृषी उत्पादनात वाढ करण्यासाठी पाणी हा सर्वात मोठा घटक आहे. जलस्त्रोत अपूर्ण असल्यामुळे उपलब्ध पाण्याचा सुयोग्य पध्दतीने परिणामकारक वापर करण्यासाठी ठिबक व तुषार संच बसविण्याची पध्दत प्रचलित आहे. पाण्याचा वापर कमी होऊन पीक उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते.

ठिबक व तुषार संच बसविण्यासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्याची योजना १९८६-८७ साली सुरु करण्यात आली. या योजनेखाली २ हेक्टरपर्यंत शेतजमीन धारण करणा-या आदिवासी शेतक-यांना ५० टक्के पर्यंत परंतु जास्तीत जास्त रु. २०,५०० /- च्या मर्यादेत, २ ते ६ हेक्टरपर्यंत जमीन धारण करणा-या आदिवासी शेतक-यांना रुपये १४,३५० /- एवढे कमाल मर्यादेच्या अधिन राहून ३५ टक्के एवढे अर्थसाहाय्य ६ हेक्टरपेक्षा जास्त जमीन धारण करणा-या आदिवासी शेतक-यांना रु. १२,२५० /- च्या कमाल मर्यादेच्या अधिन ३० टक्के दराने अर्थसहाय्य दिले जाते.

**पात्रता :**

१. लाभार्थी अनुसूचित जमातीतील शेतकरी असावा.
२. स्वतःची जमिन असावी.
३. पाण्याचे स्त्रोत व पाण्याची उपलब्धता असावी.

**संपर्क :**

गटविकास अधिकारी, तालुका पंचायत समिती / अधिक्षक कृषी अधिकारी जिल्हा परिषद.

## आदिवासी शेतक-यांना दारिद्रय रेषेवर आणण्यासाठी पॅकेज योजना

**उद्देश व स्वरुप :**

आपला देश कृषी प्रधान व विकसनशील देश आहे. आपल्या देशातील लोकसंख्येतील ८० टक्के लोक हे शेती व्यवसाय करत असून अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून असल्याने शेती व्यवसायास अनन्य साधारण महत्व आहे. त्यातही महाराष्ट्र राज्यातील सुमारे ६८ टक्के आदिवासी लोकसंख्या दारिद्रय रेषेखालील आहे. अशा शेतक-यांचे आर्थिक उत्पन्न वाढवून त्यांना विकासाच्या प्रक्रियेत सामील होता यावे यासाठी सदर योजनेअंतर्गत आदिवासी कुटूंबांना शेतीच्या उत्पादकतेत वाढ होण्यासाठी सहाय्यभूत ठरणा-या विभिन्न बाबींवर अर्थसहाय्य दिले जाते. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ. क्र. | बाब | अनुदान मर्यादा | अनुदानाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | भू-सुधार कामे | ११००० | १०० |
| २ | निविष्ठा संच | १५०० | १०० |
| ३ | सुधारित कृषी अवजारे आणि पीक संरक्षकसाहित्य | ६००० | १०० |
| ४ | जुन्या विहिरी आणि पाईप लाईन्सची दुरुस्ती | ४००० | ५० |
| ५ | कुपनलिकेचे खोदकाम | ८००० | १०० |
| ६ | बैलजोडी वाटप | ७००० | ५० |
| ७ | बैलगाडयांचे वाटप | ५४०० | ५० |
| ८ | पाईपलाईन | ३५०० | ५० |
| ९ | पंपसेट | १०००० | १०० |
| १० | नवीन विहिरी | ५०००० | १० |

या योजनेद्वारे ज्या आदिवासी शेतक-यांचे वार्षिक उत्पन्न रुपये ६,४०० /- पर्यंत आहे. त्यांना अर्थसहाय्य देण्यात येते. राज्यशासनाने ठाणे, रायगड, यवतमाळ आणि गडचिरोली जिल्हयातील आदिम जमातीच्या लाभधारकांना बैलजोडी व बैलगाडी खरेदी करण्याकरीता ८० टक्के दरोन अर्थसहाय्य व उर्वरित २० टक्के रक्कम बिनव्याजी कर्ज म्हणून दिले जाते. लाभार्थींना त्यांच्या गरजेप्रमाणे एका किंवा अधिक बाबींचा लाभ घेता येतो. तथापी हे अर्थसहाय्य फक्त ३०,००० /- पर्यंत मर्यादित आहे.

**पात्रता :**

१. लाभधारक हा अनुसूचित जमातीचा शेतकरी असावा.
२. दारिद्रय रेषेखालील असावा.
३. ज्या आदिवासी शेतक-यांचे वार्षिक उत्पन्न रु. ६४०० /- पर्यंत आहे त्यांना अर्थसहाय्य देय आहे.

**संपर्क :**

पंचायत समिती / जिल्हा परिषद - मधील कृषी विभाग.

**पशुसंवर्धन विभाग**

## शेळया मेंढयांचा गट पुरवठा करणे

**उद्देश व स्वरुप :**

आदिवासींच्या आर्थिक स्थितीमध्ये वाढ होण्यास मदत होईल या उद्देशाने पशुसंवर्धन या कार्यक्रमाखाली विविध योजना हाती घेण्यात आल्या आहेत. या योजनेअंतर्गत १० शेळया + १ बोकड असा गट आदिवासी लाभार्थींना ५० टक्के अनुदानावर पुरविला जातो. नाबार्डच्या प्रचलित दरानुसार गटाची किंमत ठरविण्यात येते.

**पात्रता :**

१. लाभार्थी अनुसूचित जमातीचा असावा.
२. दारिद्रय रेषेखालील लाभार्थी असावा.

**संपर्क :**

गटविकास अधिकारी, पंचायत समिती / व जिल्हा परिषद अंतर्गत गटविकास अधिकारी.

# अवरुद्ध पाण्यात मत्स्य संवर्धन करणे

**उद्देश व स्वरुप :**

आदिवासी क्षेत्रात मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्प घेण्यात आल्यामुळे मोठया संख्येने जलाशये निर्माण झालेली आहेत. त्यामुळे आदिवासी क्षेत्रामध्ये मुख्यतः किनारा नसलेल्या जिल्हयामध्ये आदिवासी लोकांचा मच्छिमारी व्यवसाय हा अर्धवेळ आहे व त्यावर काही प्रमाणात त्यांचा उदरनिर्वाह चालत आलेला आहे. नविन पध्दतीचा अवलंब करुन त्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी मत्स्यव्यवसाय विभागामार्फत निरनिराळया योजना राबविण्यात येत आहेत. गोडया पाण्यातील मत्स्यशेती करिता जलद क्षेत्रात जलद वाढणा-या माशांच्या जातीची बीज निर्मिती करणे व उपलब्ध जलक्षेत्राचा वापर जास्तीत जास्त मत्स्यपालनासाठी करणे हा होय. या योजनेखाली सहकारी संस्थांना तसेच स्थानिक संस्थांना बीज संचयनासाठी बीजाचा सवलतीच्या दरात पुरवठा करण्यात येतो. त्याचप्रमाणे संवर्धन, तळयाचे बांधकाम, खाद्य तसेच खताची खरेदी यावर अनुदान देण्यात येते. मत्स्योत्पादन वाढविणे व ग्रामीण आदिवासींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**पात्रता :**

१. लाभार्थी अनुसूचित जमातीचा असावा.

२. लाभार्थी त्या लाभक्षेत्रातील असावा.

३. मच्छिमारीचे त्याला ज्ञान उपजत असावे.

**संपर्क :**

जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी.

## सहकार विभाग - वैयक्तिक लाभाच्या योजना व्याज अनुदान

**उद्देश व स्वरुप :**

आदिवासी सहकारी संस्थांच्या आदिवासी सभासदांना सवलतीच्या दराने पीक कर्ज वितरीत केले जाते त्यावरील व्याजापोटी अनुदान शासनामार्फत अदा केले जाते. आदिवासी शेतक-यांना व्याज अनुदान देण्यासाठी निरनिराळया योजना राबविण्यात येतात त्यापैकी वरीलप्रमाणे योजना आहे.

**पात्रता :**

१. आदिवासी सहकारी संस्थेचा सभासद असावा.
२. स्वतःच्या नावे शेती असावी.
३. मंजूर कर्जाची परतफेड ३० जून च्या आत केलेले लाभार्थी.

**संपर्क :**

१. संबंधित जिल्हयाचे जिल्हा उपनिबंधक.
२. स्थानिक आदिवासी सहकारी संस्था.

# शासकीय आश्रम शाळा समुह योजना

**उद्देश व स्वरुप** :

महाराष्ट्र राज्यात डोंगराळ व दुर्गम भागात राहणा-या अनुसूचित जमातीचे सामाजीक व शैक्षणिक प्रगती होण्यासाठी सन १९७२-७३ पासून क्षेत्रविकासाचा दृष्टीकोन स्विकारण्यात आला अशा भागाचा मूलभूत विकास व्हावा आणि त्याचा फायदा सर्वांना व्हावा यासाठी तेथे मूळ केंद्रस्थान म्हणून आश्रमशाळा आसावी या शाळेत आदिवासी विद्यार्थ्यांची इ. १० वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय उपलब्ध आहे.

सदर आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश,आंथरुण पांघरुण, पुस्तके व इतर लेखन साहित्य इ. सुविधा शासनाकडून मोफत पुरविण्यात येतात.

**पात्रता :**

१. आश्रमीय विद्यार्थी हे आदिवासीच असावे.
२. मुला-मुलीस ३१ जुलैला ५ वर्ष पूर्ण असावी
३. प्रत्यक्ष प्रवेश देतेवेळी जाती / जमातीचा दाखला, जन्मतारखेचा दाखला, आई-वडीलांचे प्रतिज्ञापत्र.
४. पहिली व्यतिरिक्त इतर वर्गातील प्रवेशाकरिता पूर्वीच्या शाळेचा शाळा सोडल्याचा दाखला.
५. आश्रमशाळेच्या १ कि.मी. परिसरातील मुले-मुली अनिवासी म्हणून व त्या क्षेत्राच्या बाहेरील निवासी विद्यार्थी म्हणून प्रवेश.
६. आश्रमशाळेत प्रत्येक वर्गात निवासी ४० व बहिस्थ १० विद्यार्थी.
७. आश्रमशाळेमध्ये मुला मुलींचे प्रमाण ५० : ५० प्रमाणे व ५० टक्के मुली मिळाल्या नाहीतर विद्यार्थीनींची क्षमता किमान ३३ टक्के आवश्यक जर सदर टक्केवारी पूर्ण झाली नाही तर आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश देवून क्षमता पूर्ण करणे.
८. आश्रमशाळांमध्ये प्रत्येक वर्गात शारीरीक दृष्टया अपंग विद्यार्थ्यांसाठी ३ टक्के आरक्षण.
९. दारीद्रय रेषेखालील आदिवासी जमातीच्या भूमिहीन /अल्पभूधारक विद्यार्थ्यांना प्राधान्य.

**संपर्कः**

संबंधीत मुख्याध्यापक, शासकीय आश्रमशाळा.

# स्वेच्छा संस्थांना आश्रमशाळा चालविण्यास अर्थसहाय्य

**उद्देश व स्वरुप:**

आदिवासींच्या शैक्षणिक विकासाकरिता कार्यरत असलेल्या स्वेच्छा संस्थांमार्फत स्थापन करण्यात आलेल्या आश्रमशाळांना १९५३-५४ पासून अनुदान देण्याची योजना राबविण्यात येत आहे.

या आश्रमशाळांत आदिवासी विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेष, शैक्षणिक साहित्य व इतर सवलती मोफत उपलब्ध करुन देण्यात येतात. त्याकरिता कर्मचा-यांचे पगार व परीक्षणाकरिता विहित प्रमाणात अनूदान शासनाकडून देण्यात येते.

**प्रवेशाच्या अटी:**

शासकीय आश्रमशाळेत प्रवेशाकरिता असलेल्या सर्व अटी लागू.

**संपर्क :** संबंधित आश्रमशाळांचे मुख्याध्यापक / संस्थाचालक.

अनुदानित आश्रमशाळेस मान्यतेकरिता अटी :

१. संस्था नोंदणीकृत असली पाहिजे.
२. विहित नमून्यात आश्रमशाळा सुरु करण्याच्या ठिकाणाचे सर्वेक्षण, उपलब्ध विद्यार्थी संख्या, संस्थेची आर्थिक स्थिती, आदिवासी क्षेत्रातील कार्य इ. च्या माहितीसह अर्ज करणे आवश्यक.

**संपर्क :** संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

## आदर्श आश्रमशाळा

**उद्देश व स्वरुप :**

शासकीय / अनुदानित आश्रमशाळांतून शिक्षण घेणा-या हुशार / बुध्दीवान / प्रज्ञावंत विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी विद्या निकेतनच्या धर्तीवर विशेष स्वरुपाची शाळा ) राज्यात दोन ठिकाणी सन १९९०-९१ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे

**पात्रता :**

आश्रमशाळांतून शिक्षण घेणा-या हुशार / बुध्दीवान / प्रज्ञावंत विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी विद्या निकेतनच्या धर्तीवर अनुसूचित जमातीच्या मुलांना शिक्षण देणे.

**संपर्कः**

स्पर्धा परिक्षेकरिता संबंधित शाळांचे मुख्याध्यापक प्रकल्प अधिकारी प्रवेशाकरिता संबंधित आदर्श आश्रमशाळेचे मुख्याध्यापक.

# एकलव्य इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा

## (केंद्र पुरस्कृत पब्लिक स्कूल)

**उद्देश व स्वरुप :-**

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजीमधून शिक्षण मिळावे याकरिता इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा ही केंद्रपुरस्कृत योजना राबविली जात आहे. अशा शाळेत इ. ५ वी ते इ. १० वी पर्यंत शिक्षण देण्यात येते. अशा इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळा १) पेठरोड, नाशिक, जि. नाशिक. २) बोर्डी ता. डहाणू, जि. ठाणे ३) तालुस्ते (बडनेरा) ता. नांदगांव खांडेश्वर ४) चिखलदरा, ता. धारणी, जि. अमरावती ५) खैरी परसोडा, ता.जि.नागपूर येथे आहेत.

**सुविधा -**

अशा निवासी शाळेत विद्यार्थ्यांची निवासी व्यवस्था, भोजन, गणवेश, आंथरुण, पांघरुण, पुस्तके, लेखन साहित्य इत्यादी सुविधा मोफत उपलब्ध आहेत.

**पात्रता :-**

१. विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.
२. शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, जिल्हा परिषद शाळा इत्यादी शाळांमध्ये इ. ४ थी ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची स्वतंत्र स्पर्धापरीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी. ३. स्पर्धा परीक्षा एप्रिल मे मध्ये त्या-त्या जिल्हयातील आदिवासी प्रकल्प क्षेत्रात घेण्यात येतात.

**संपर्क :-**

१. संबंधित शाळांचे मुख्याध्यापक.
२. पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक.

# आदिवासी मुलां / मुलींकरिता शासकीय वसतिगृहे

**उद्देश व स्वरुप :**

अनुसूचित जमातीच्या मुलां / मुलींना उच्च शिक्षणाची सोय व्हावी व त्यांची शैक्षणिक उन्नती व्हावी या उद्देशाने सदर योजना सुरु करण्यात आलेली आहे. शासकीय वसतिगृहात गुणवत्तेनुसार प्रवेश देऊन त्यांना निवास, भोजन, आंथरुण, पांघरूण, पाठयपुस्तके, शैक्षणिक व इतर आवश्यक साहित्य मोफत पुरविण्यात येते.

**पात्रता :**

१. विद्यार्थी आदिवासी व महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
२. विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये २४,०००/- पेक्षा कमी असावे.
३. विहीत नमुन्यात शाळा सोडल्याचा व प्रवेश घेतल्याचा दाखला, गुणपत्रिका, जातीचा, उत्पन्नाचा व वर्तणुकीचा दाखला आणि फोटोसह अर्ज मुदतीत सादर केला पाहिजे. कनिष्ठ महाविद्यालयीन व उच्च महाविद्यालयीन शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी टक्केवारी

जिल्हा व तालुकास्तरावर खालील प्रमाणे -

१) कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणारे -२५ टक्के
२) उच्च महाविद्यालयात शिक्षण घेणारे – ६५ टक्के
३) माध्य.शिक्षण घेणारे -१० टक्के विभागीय स्तरावर
४) क.महाविद्यालयात शिक्षण घेणारे २० टक्के
५) उच्च महाविद्यालयात शिक्षण घेणारे ८० टक्के

**संपर्कः**

संबंधित वसतिगृहाचे गृहपाल.

# आदिवासी विद्यार्थ्यांना शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना

**उद्देश व स्वरुप :**

आदिवासी विद्यार्थ्यांना शालांत परिक्षोत्तर उच्च शिक्षणाकरिता प्रोत्साहीत करण्याच्या दृष्टीने व त्यांना उच्च शिक्षणाचा खर्च भागवीता यावा म्हणून भारत सरकारद्वारा ही योजना राबविली जाते.

१) वैद्यकिय व अभियांत्रिक अभ्याक्रमातील निवासी विद्यार्थ्यांना ७४०/- रु व अनिवासी साठी रु ३३०/-

२) तांत्रिक,आयुर्वेदिक, होमिओपॅथीक इ.शास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रमातील निवासी विद्यार्थ्यांसाठी ५१०/- रु दरमहा व अनिवासी विद्यार्थ्यांसाठी ३३० /- रु. दरमहा.

३) पदवीचे सामान्य अभ्यासक्रम, अभियांत्रिकी पदविका प्रमाणपत्र वास्तुकला इ.साठी निवासी ३५५/- रु अनिवासीसाठी १८५/- रुपये

४) इ. ११वी १२ वी साठी व पदवीचे पहिल्या वर्षातील निवासी विद्यार्थ्यांसाठी दरमहा २३५/- रु व अनिवासीसाठी १४०/- रु निर्वाहभत्ता देण्यात येतो.

**पात्रता :**

२) विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.

३) पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये १ लाखापेक्षा जास्त नसावे.

४) विद्यार्थी पूर्णवेळ नोकरीतील नसावा.

५) एकाच कुटुंबातील फक्त २ मुलांना परंतु सर्व मुली लाभ घेण्यास पात्र आहे.

६) विहित नमुन्यात अर्ज सादर केला पाहिजे.

**संपर्कः**

संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यामार्फत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची प्रतिपुर्ती करणे - योजना

**उद्देश व स्वरुप :**

कोणत्याही स्तरावर शिक्षण घेणा-या आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण घेता यावे व उत्पन्न मर्यादेमुळे भारत सरकार शिष्यवृत्तीसारख्या योजनांचा फायदा मिळू न शकणा-या विद्यार्थ्यांकरिता शिक्षण विभागाने ठरवून दिलेल्या दराने मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेत शिक्षण घेणा-या आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची शिक्षण संस्थेस प्रतिभूती करण्यात येते.

**पात्रतेच्या अटी :**

१. विद्यार्थी / विद्यार्थ्यांनी आदिवासी असले पाहिजे.

२. शिक्षण संस्था प्रमुखांमार्फत विहित नमुन्यात प्रस्ताव संबंधित अधिका-याकडे पाठविला पाहिजे.

**संपर्क :**

१. इ.१ली ते इ.१०वी - शाळांच्या मुख्याध्यापकांमार्फत समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद.

२. महाविद्यालयीन विद्यार्थी - प्राचार्यांमार्फत संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

## व्यावसायीक पाठक्रमात शिकणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देणे

**उद्देश व स्वरुप :**

आर्थिक दृष्टया परवडत नसल्यामुळे इतर आर्थिक सवलतीशिवाय व्यावसायिक शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना लागणा-या जादा खर्चाची तोंडमिळवणी करता यावी म्हणून निर्वाह भत्ता देण्याची योजना

१. ४ ते ५ वर्षांच्या च्या अभ्यासक्रमासाठी वसतिगृहात राहणा-या विद्यार्थ्यांना रुपये ७०० दरमहा व वसतिगृहात न राहणा-या विद्यार्थ्यांना रुपये १,०००/- दरमहा.

२. २ ते ३ वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी वसतिगृहात राहणा-या विद्यार्थ्यांना रुपये ५०० दरमहा व वसतिगृहात न राहणा-या विद्यार्थ्यांना रुपये ७,००/- दरमहा.

३. २ वर्ष किंवा त्यापेक्षा कमी कालावधीच्या अभ्यासक्रमासाठी वसतिगृहात राहणा-या विद्यार्थ्यांना रुपये ५०० दरमहा व वसतिगृहात न राहणा-या विद्यार्थ्यांना रुपये ५००/- दरमहा निर्वाह भत्ता दिला जातो.

**पात्रता :**

१. विद्यार्थी आदिवासी व महाराष्ट्राचा रहिवाशी असावा.

२. त्याने वैद्यकीय, अभियांत्रिकी, आयुर्वेद / होमिओपॅथी इत्यादी व्यावसायिक मान्यताप्राप्त अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेला असावा.

३. त्याची वर्तणूक, हजेरी व प्रगती समाधानकारक असावी.

४. विहीत प्रपत्रात जातीचे, नागरिकत्वाचे प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला इ. आवश्यक कागदपत्रांसह महाविद्यालयाच्या प्राचार्यामार्फत अर्ज केलेला असावा.

**संपर्कः**

संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यामार्फत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

**टिप - सदरील उपरोक्त सर्व कार्यक्रम व योजनांच्या माहितीमध्ये वेळोवेळी संबंधित विभागाकडुन सुधारणा होत असते. त्यामुळे प्रकल्पात योजनेचा समावेश करण्यापुर्वी संबंधित विभाग व कार्यालयाकडुन योजनेची अद्ययावत माहिती प्राप्त करुन घ्यावी ही विनंती.*

***